# ओळख



**बबन सराडकर :**

साहित्य पारंगत, संगीत विशारद, संपादक-विदर्भ जनजागर. जन्म १० सप्टेंबर १९५३ अमरावती येथे, शासकी महाविद्यालयाच्या संगीत विभागात काही काळ नोकरी.

**व्यवसाय :** शेती व पत्रकारिता. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, लोकमत व पुण्यनगरीमध्ये स्तंभलेखन, चंद्रबन, समुद्रपक्षी, कृष्णविवर, तू माझा सांगाती, हंबर, पापणपालखी... हे ६ काव्यसंग्रह तसेच एक गीतसंग्रह प्रसिद्ध. 'चंद्रबन' या पहिल्याच संग्रहाला महाराष्ट्र शासनाचा केशवसुत राज्यपुरस्कार, १९८५-८६. अमरावती संत गाडगेबाबा विद्यापीठात 'चंद्रबन' हा संग्रह काही काळ एम.ए. मराठीच्या अभ्यासक्रमात. राज्यातील वेगवेगळ्या विद्यापीठांत बी.ए., एम.ए., बी.कॉम., बी.एस्सी., इत्यादी अभ्यासक्रमांत काही कविता. कवी कुसुमाग्रज, शिरीष पै, मंगेश पाडगावकर, यशवंत देव, मधुकर केचे, हृदयनाथ मंगेशकर, डॉ. आशा सावदेकर, राम शेवाळकर अशा दिग्गज मान्यवरांची संग्रहांना प्रस्तावना, अभिप्राय व पाठराखण. नागपूर आकाशवाणीवर मान्यताप्राप्त कवी व मान्यताप्राप्त सुगम गायक म्हणून निवड-सन्मान. चार अभ्यासकांचे समग्र कवितांवर एम.फिल. तर तीन अभ्यासकांचे पीएच.डी. साठी संशोधन.

**पुरस्कार :**

- केशवसुत राज्यपुरस्कार. (महाराष्ट्र शासन - १९८५-८६)
- डॉ. गिरीश गांधी फाऊंडेशनचा काव्यपुरस्कार - २०१८.
- पुणे येथील शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानचा संत गाडगे बाबा समाजगौरव पुरस्कार - २०११.
- स्व. शंकर बडे स्मृती मायबोली सन्मान - २०१९.
- अक्षरतपस्वी पुरस्कार-२०१०.
- वि. सा. संघाचा शरदचंद्र मुक्तिबोध पुरस्कार - २०२३
- वृक्षमित्र पुरस्कार - स्व. ढाकरे कला अकादमीचा राज्यस्तरीय काव्यपुरस्कार-२०१०.
- जीवनगौरव पुरस्कार-२०१३
- पद्मगंधा पुरस्कार - २०२३
- शिवगौरव पुरस्कार
- साहित्य विहार, नागपूरचा 'शब्दानुरागी' सन्मान - २०२३
- ओंकार साधना सन्मान.

असे अनेक संस्थांचे पुरस्कार

काही ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध. त्यातील गीत-गझलांना महाराष्ट्रातील नामवंत गायकांचा स्वर. अ.भा. मराठी साहित्य संमेलनांत अनेकदा सहभाग व कविसंमेलनांचे अध्यक्षपद.

अनेक राज्यस्तरीय काव्यस्पर्धा व गीतगायन स्पर्धांचे परीक्षण, अभिजात मराठी शिक्षक सा. परिषदेच्या अमरावती येथील राज्यस्तरीय सा. संमेलनाचे अध्यक्षपद. 'शब्दगंध' राज्यस्तरीय साहित्य संमेलन अध्यक्षपद-२०१८.

सृजन साहित्य संघाच्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.

सांस्कृतिक मंत्रालयाच्या (भारत सरकार) कर्नाटक येथील राष्ट्रीय बहुभाषिक कविसंमेलनात काव्यगायन. दिल्ली येथील साहित्य अकादमीच्या 'मराठी गझल : अर्धशतकाचा प्रवास' या संग्रहात ५ गझलांचा समावेश. दिल्ली येथील युगस्पंदन तसेच अनुवादपत्रिका या दर्जेदार मासिकांत काही कवितांचा हिंदी अनुवाद.

महाराष्ट्रातील अनेक कवींच्या संग्रहांना प्रस्तावना व पाठराखण.

'मी आणि माझी कविता', या विषयावर विविध ठिकाणी भाषणे व काव्यगाय.

सत्यकथा, प्रतिष्ठान, युगवाणी, महा. साहित्य पत्रिका, महाराष्ट्र टाईम्स, कवितारती, साधना... अशा वाङ्मयीन नियतकालिकांत सातत्याने कविता प्रकाशित.

नागपूर आकाशवाणी / दूरदर्शनवर काव्यगायन व सुगम गायनाचे वेळोवेळी प्रसारण.